
Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
Journal No. 47023

ISSN 2319 - 8508
An International Multidisciplinary
Half Yearly Research Journal

# GALAXY LINK



Volume - XI, Issue - I,
November - April - 2022-23
Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2020 - 6.495
www.sjifactor.com



Ajanta Prakashan

Govt. College of Arts & Science * Aurangabad *

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २४ | आधुनिक कवी डॉ. रानडे मॅडमचे बालगीते<br>**कु. वैष्णवी लक्ष्मीकांत वेळूकर** | ११४-११७ |
| २५ | नवीन शैक्षणिक धोरण २०२० आणि संशोधनाची भूमिका<br>**प्रा. डॉ. गणंजय कहाळेकर** | ११८-१२१ |
| २६ | महाराष्ट्राची संस्कृत महाकाव्य सृष्टी<br>**डॉ. सौ. अबोली व्यास** | १२२-१२९ |
| २७ | भारतीय संगीत आणि संस्कृत ग्रंथ<br>**डॉ. वैशाली देशमुख** | १३०-१३४ |
| २८ | चित्रपट गीतांचा संस्कृत अनुवाद एक अध्ययन<br>**प्राजक्ता आनंद बुडईकर (कुकडकर)** | १३५-१४० |




Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

VOLUME - XI, ISSUE - I - NOVEMBER - APRIL - 2022-23
GALAXY LINK - ISSN 2319 - 8508 - IMPACT FACTOR - 6.495 (www.sjifactor.com) CC - 24

# २७. भारतीय संगीत आणि संस्कृत ग्रंथ

**डॉ. वैशाली देशमुख**
सहयोगी प्राध्यापक, संगीत विभाग प्रमुख, शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद.

भारतीय संगीताच्या इतिहासात संस्कृत भाषेचे महत्व संगीता एवढेच आहे कारण भारतीय संगीताचा इतिहास संस्कृत भाषेतच लिहीलेला आढळुन येतो. भारतीय संगीताचा आदिग्रंथ पं.भरत यांचा नाट्यशास्त्र हा ग्रंथ देखील संस्कृत भाषेतच लिहीला आहे. त्यामुळे संस्कृत आणि संगीताचा संबंध हा संगीताच्या उत्पत्तीपासूनच आहे असे आपल्याला म्हणता येईल.

संस्कृत ही एक सर्वात प्राचीन भाषा असून ती समृध्द, अभिजात आणि शास्त्रीय भाषा मानली जाते. विख्यात व्याकरणतज्ञ पाणिनीने इ.स.पूर्व काळात संस्कृत भाषेला प्रमाणित केले. संस्कृत भाषेमधूनच उत्तर भारतीय भाषांचा जन्म झालेला आहे. म्हणून संस्कृत भाषेला सर्व भाषांची जननी म्हटले जाते. संस्कृत भाषेला गीर्वाणवाणी, सुरभारती, देववाणी, देवीवाक, देवभाषा, अमरभारती इ. अनेक नावांनी संबोधिले जाते. कवी वाल्मीकी हे संस्कृत भाषेचे आधकवी होत.

संपूर्ण जगातील सर्वात प्राचीन ग्रंथ ऋग्वेद हा संस्कृत भाषेतच आहे. पाच हजार वर्षांपूर्वीचे समजले जाणारे भारतीय संगीत व त्याचा इतिहास जगात सर्वात प्राचीन मानला जातो.

संगीत रत्नकार या ग्रंथातील संगीताची मुळ व्याख्या ही संस्कृत भाषेतच लोकप्रिय आहे. गीतं, वाद्य, त्रयं सगीतमुच्युते । अर्थात गायन, वादन आणि नृत्य यांच्या समुहाला संगीत म्हटले जाते.

प्राचीन काळातील बोली भाषा ही संस्कृतच मानली जात असे. त्यामुळे सर्व व्यवहारातील कार्ये संस्कृत मध्येच केली जात असत. त्यामुळे ही भाषा काहीतरी वेगळी भाषा असे वाटत नसे म्हणूनच त्याकाळातील सर्व लेखनकार्य संस्कृत भाषेतच केलेले आढळुन येते.

संगीतातील त्याकाळातील सर्व ग्रंथ हे संस्कृत भाषेतच लिहीलेले आहेत त्यामुळे संस्कृत आणि संगीताचा संबंध हजारो वर्षापूर्वी पासुनचा आहे. श्रीमद्‌भगवद्‌गीते मध्ये 'वेदानां सामवेदोड स्मि म्हणजे वेदांमध्ये साम आहे आणि सामचा अर्थ गान आहे. म्हणुनच संगीताला काही विव्दान, पंडीत पंचमवेद कींवा गांधर्व वेद असेही म्हणतात. सुप्रसिध्द लेखक लौडन यांच्या मते संगीत ही एक विश्व भाषा आहे. पं.रवींद्रनाथ टागोर यांच्या मते शब्दांचा शेवट जीथे होतो तिथुन संगीताची सुरूवात होते. संपूर्ण विश्वातील चराचरात संगीताचा अंश असलेला दिसून येतो.

भारतीय संगीतातील सर्व प्राचीन ग्रंथ संस्कृत भाषेत लिहीलेले असल्यामुळे संस्कृत आणि संगीत या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

वेदकाळातील सर्वात प्राचीन ग्रंथ ऋग्वेद मानला जातो. हा संपूर्ण ग्रंथ संस्कृत भाषेतच आहे आणि यामध्ये संगीता विषयी संदर्भ असलेले आपल्याला दिसून येतात. ऋक ही संहीता प्राचीन प्रथम संहीता मानली जाते. यामध्येच यजु व साम



College of Arts & Science Aurangabad.
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science

यांचा उल्लेख आढळतो. साम या शब्दाचा अर्थ स्वर होतो असे म्हटले आहे. संहिता याचा अर्थ एकत्रीकरण, ग्रंथाची रचना, मांडणी, पुराणा दि ग्रंथ कींवा Script किंवा वेदांचा संग्रह असाही होतो. काही विद्वानांच्या मते गायनास उपयुक्त वेद मंत्राच्या संग्रहाला संहीता म्हटले जाते. ऋग्वेद संहीतेमध्ये गायनासाठी गीर, गाथा, गायत्र, गीती, साम आदि शब्दांचा उल्लेख आढळतो. गायकाला गातुवित म्हटले आहे. यजुर्वेद संहितेमध्ये वीणा या वाद्यासोबत अनेक वाद्यांचा उल्लेख आढळतो. अथर्व वेद संहीतेमध्ये देखील संगीताचा उल्लेख आढळुन येतो. सामवेदामध्ये सामचा अर्थ गायन आणि वेदचा अर्थ ज्ञान म्हणजेच गायनाचे ज्ञान असा होतो.

भारतीय संगीत शास्त्र साम संहीतेलाच संगीताचा आधार मानतात. भारतीय संगीतातील सर्व ग्रंथ हे साम संहीतेलाच संगीत विद्येचा आधार मानतात. सा आणि अम म्हणजे साम. सा चा अर्थ ऋचा आणि अम चा अर्थ षड्ज, रिषभ, इ.स्वर ऋचा जेंव्हा सात स्वरांमध्ये एकरूप होतील तेंव्हा साम संहीता तयार होते. वैदिक काळातील संगीत तज्ञ सप्त स्वरांमध्ये सामगायन करीत असत. त्या काळात सामगान स्वरलीपी देखील अस्तित्वात होती. वरील सर्व संहीतांमधील वर्णन संस्कृत भाषेत असल्यामुळे अगदी सुरूवातीच्या काळापासून संस्कृत संगीत अनुबंध आहेच हे लक्षात येते. म्हणजेच सर्व ऋचांचे गायन हे वैदिक काळी सात स्वरांमध्ये होत असे. वैदिक काळात वादन आणि नृत्याचाही उल्लेख आढळुन येतो.

संस्कृत भाषेतील ब्राम्हण ग्रंथाची निर्मिती चार वेदानंतर झालेली आहे. या वेदानंतर ज्या साहीत्याची निर्मिती झाली किंवा लेखन झाले त्यांना ब्राम्हण ग्रंथ म्हटले जाते. त्यामध्ये ब्राम्हण, आरण्यक व उपनिषदांची निर्मिती झाली. तैतरीय उपनिषद, ऐतरीय उपनिषद आणि शतपथ ब्राम्हणमध्ये संगीत विषयक माहीती आढळुन येते. तसेच स्वरस्थान आणि मुर्छना या संदर्भात माहीती असुन षड्ज ग्रामाची पहीली मुर्छना उत्तरमंद्रा आहे असा उल्लेख केलेला आहे. तैत्तरीय ब्राम्हण ग्रंथामध्ये वाद्यांचा उल्लेख आहे. उदा.वीणा, दुंदुभि, शंख, तूणव. वीणावादकाला गणगित म्हणत असत. ब्राम्हण काळात संगीताचा प्रचार सर्व सामाजिक स्तरांमध्ये होता. या काळात सामगाना व्यतिरिक्त जे गायन होत असे त्याला गाथा म्हणत असत.

त्यानंतर लिहीला गेलेला प्रमुख संस्कृत ग्रंथ म्हणजे उपनिषद यामध्ये स्वरसाधना संदर्भात अतिशय सखोल व सुक्ष्म विवेचन केलेले आहे. यामध्ये असे वर्णन आढळते की अनेक स्वरांची साधना करतांना दिर्घ श्वसनाची आवश्यकता असते. आणि यासाठी गायकाला 'काकश्वासोच्छावास' या विद्येचा अभ्यास करणे आवश्यक आहे असे विवेचनात आढळते. ज्या वायुला आपण शरीराच्या बाहेर टाकतो त्याला प्राण म्हटले आहे आणि ज्या वायुला आतमध्ये घेतो त्याला अपान म्हटलेले आहे. प्राण आणि अपान याच्या मध्यस्थिला व्यान म्हटले आहे ज्यामुळे कींवा व्याया वायूमुळे भाषेची निर्मिती होते. इतके सुक्ष्म वर्णन या उपनिषदांमध्ये केलेले आहे. थोडक्यात या सर्व संस्कृत ग्रंथामध्ये संगीताचा झालेला विकास लिखित स्वरूपात आढळुन येतो व त्याचे वर्णन या सर्व संस्कृत ग्रंथामध्ये केलेले आहे.

त्यानंतरच्या प्रातिशाख्य या संस्कृत ग्रंथात सुत्रांमध्ये संगीत विषयक माहीती लिहीलेली आहे प्रातिशाख्य मध्ये स्वराला 'यम' म्हटले आहे त्याची तीन स्थाने सांगितली आहेत. "तेषू मन्द्रमुरसिवर्तते । मध्यम कण्ढे वर्तते । उत्तमं शिरसि वर्तते ।" याचा अर्थ असा होतो की, हृदयामधुन उत्पन्न होणारा नाद मंद्र, काळातून उत्पन्न होणारा नाद मध्यम आणि डोक्यातुन उत्पन्न



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

होणारा नाद उत्तम असतो. वर्तमान काळात यालाच मंद्र, मध्य व तार म्हटले जाते. प्रातिशाख्य या ग्रंथात ध्वनि आणि त्याचे उच्चारण या संबधी विस्तृत विवेचन केलेले आहे.

संस्कृतमधील शिक्षा ग्रंथामध्ये पाणिनी यांनी नादोत्पत्तीची प्रक्रीया खालीलप्रमाणे सांगितली आहे.

आत्मा बुध्दा समेत्यार्थान मनो युक्ते विवक्षया ।

मन: कायाग्निमाहन्ति से प्रेरयति मारूतम ।।

मारूतस्तूरसि चरन्मद्र जनयति स्वरम् ।

या ग्रंथानंतर संस्कृतमध्ये पुराणामध्ये संगीताविषयी विस्तृत विवेचन केलेले आहे. पुराणांची संख्या १८ प्रकारची आहे. पुराणांमध्ये भारतीय संगीताचा इतिहास संस्कृतमध्ये अतिशय स्वच्छ व खरा इतिहास लिहीलेला आहे. पुराणांमध्ये सात स्वर, तीन ग्राम, एकविस मुर्छना आणि एकोणपन्नास तानांविषयी लिहीलेले आहे. विष्णूधर्मोत्तर पुराणामध्ये गीताचे तीन भेद, वादी, संवादी, अनूवादी, स्वरांनूसार रसांचा प्रयोग, जातिची दहा लक्षणे इ. विषयी विस्तृत वर्णन केलेले आहे. लय व ताल या विषयी खूप माहीती लिहीलेली आढळते मार्कण्डेय पुराणामध्ये वाद्यांचे चार प्रकार लिहीलेले आहेत. तत् , अवनध्द, घन आणि सुषिर या प्रकारांचा उल्लेख केलेला आहे.

रामायण या संस्कृत ग्रंथात संगीताविषयी अनेक वर्णने आढळतात संगीत शब्दाचा उल्लेख यामध्ये केलेला आहे. संगीतशास्त्रासाठी 'गंधर्व' शब्दाचा उल्लेख आहे. नृत्याचा उल्लेख अनेक ठिकाणी केलेला आढळतो. किष्कींधा, लंका आणि अयोध्येमध्ये संगीताचा सामाजिक जीवनामध्ये वारंवार प्रयोग होत असे. अनेक वाद्यांचा उल्लेख या काळात केलेला असून नृत्य कलाकारांचे जीवन व्यतीत करण्याचे साधन नृत्य कला होती. दैनंदिन जीवनात संगीताला महत्वाचे स्थान होते. राजा महाराजांना संगीताच्या मधुर स्वरलहरींव्दारे सकाळी जागवले जात असे. या काळात तालांचा विकास कलेच्या दृष्टीने झालेला दिसून येतो.

महाभारत या ग्रंथात ८८०० संस्कृत श्लोक आहेत. गुरू-शिष्य परंपरेचा उल्लेख या ग्रंथात केलेला आहे. सामाजिक जीवनात संगीताला महत्वपूर्ण स्थान होते. एखाद्या संगीतकाराला राजा आपली मुलगी देण्यास तयार असे असा संगीताचा मान त्याकाळी होता. वीणा वाद्यांचा उपयोग देवदेवतांची पूजा करतांना केला जात असे. सामगाना व्यतिरिक्त देशीगान व्यवहारात मनोरंजनासाठी वापरले जात असे. या काळात संगीताचा विकास अतिशय लवकर आणि मोठ्या प्रमाणात झालेला दिसून येतो.

त्या नंतरच्या संस्कृत ग्रंथामध्ये स्मृतिग्रंथ हा महत्वपूर्ण मानला जातो. या ग्रंथात वैदिक संगीतावर स्तुतीपर वर्णन केलेले आहे आणि लौकीक संगीत म्हणजे मनोरंजनासाठीच्या संगीताचा देखील उल्लेख केलेला आहे. ब्रम्हचारी व्यक्तींसाठी संगीत निषिध्द मानले जात असे राजाच्या सकाळी उठण्याच्या वेळेला व रात्री झोपण्याच्या वेळेला तुर्यवाद्यांचा घोष केला जात असे. याज्ञवल्क्य यांच्या मते सामगायनाच्या व्यतिरिक्त ऋक, गाथा, अपरान्तक आणि उलोप्य इ. संगीतसाधनेसाठी श्रेष्ठ साधन मानले जात असे. या काळात संगीत साधना, व्यवसाय करणाऱ्याला क्षुद्र मानले जात असे.



College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

संस्कृत ग्रंथ अष्टाध्यायी मध्ये पाणिनी यांनी वृंदवादनाचा उल्लेख केलेला आहे. संगीत या शब्दासाठी पाणिनी याने शिल्प शब्दाचा उल्लेख केलेला आहे. गीती, गेय, गायक, गायन इ. उल्लेख आहे. त्याबरोबरच 'तुर्या' या वाद्याचाा उल्लेख आढळतो. मृदंग वाजविणाऱ्याला मार्दंगिक आणि पणव वाजविणाऱ्याला पाणविक म्हटले जात असे. वाद्यांमध्ये मृदंग, दुंदुभि, झर्झर आणि दर्दुर या वाद्यांचा उल्लेख आढळतो. अष्टाध्यायी मध्ये प्रमद, सम्पद, हे दोन्हीही शब्द उत्सवासाठी लिहीले आहेत. सम्पद उत्सवामध्ये नृत्य गीत आणि वाद्य यांचा सप्रयोग उपयोग केला जात असे. रंगमंचासाठी नाट्य शब्दाचा पण प्रयोग केलेला आहे. अष्टाध्यायी मध्ये वीणा, वाण, तुणक, वेणु इ. वाद्यांचा उल्लेख मिळतो. पाणिनीच्या काळात वैदिक संगीत परमोच्च स्थितीत होते. स्त्रीयांना देखील सामगानाचे शिक्षण दिले जात असे.

त्यानंतर कौटिल्याचे अर्थशास्त्र हा संस्कृत ग्रंथ लिहीला गेला. चाणक्याने यामध्ये ६००० श्लोक लिहीले आहेत. कौटिल्य चंद्रगुप्तचा प्रधानमंत्री होता. अर्थशास्त्रामध्ये संगीताला कुशीलव व्याख्या होती, त्याचा अर्थ संगीतकार असा होतो. यामध्ये असा उल्लेख मिळतो की संगीतकारांच्या जीवनाची सर्व जबाबदारी राजा स्वयं करीत असत. कौटिल्यानी संगीताचे वर्णन वरील संदर्भात केलेले दिसून येते. कौटिल्याने वाद्यभाण्ड, तुर्य, वीणा, वेणू, मृदंग, दुंदुभी इ.वाद्यांचा उल्लेख केलेला आहे.

त्यानंतर पतंजली नी पतंजली नावाचे संस्कृत महाभाष्य लिहीले, या महाभाष्यात अनेक ठीकणी नृत्याचे वर्णन केलेले आहे. त्यांना नर्ततिका असे म्हटले आहे. या काळात संगीताचे जीवनातील स्थान कमी झालेले होते. त्यामध्ये प्रादेशिक रूप प्राप्त झाले होते.

त्यांनतर कालीदास, भास आणि शुद्रक या संस्कृत पंडीतांनी संगीतमय महाकाव्यांची संस्कृत मध्ये निर्मिती केली गेली. कालीदास यांनी सात विख्यात ग्रंथांची निर्मिती केली. त्यांच्याच काळातील शुद्रकने मृच्छकटिकम् नावाचे संस्कृत नाटक नृत्यासंबंधी लिहीले. व्यास आणि शुद्रक यांच्या संस्कृत नाटकांमध्ये असे लक्षात येते की राजा महाराजांच्या जीवनात मनोरंजनासाठी संगीत सर्वतोपरी लोकप्रिय होते. सर्व कार्यामध्ये संगीताचा सहभाग आहे. तसेच राजकुमारी आणि राणी यांना देखील संगीतामध्ये विशेष आवड असे असा उल्लेख आढळतो.

वरील सर्व संस्कृत ग्रंथमधील लिखीत स्वरूपातील संगीताच्या इतिहासवरून आधुनिक काळातील संगीताचा विकास झालेला आढळुन येतो. त्यामुळे संगीताची विकासाची परंपरा आपल्या लक्षात येते आणि आपले भारतीय संगीत सुरूवातीच्या काळापासूनच कीती आधुनिक स्वरूपाचे होते असे इतिहासातील संस्कृत ग्रंथामधील अनेक उल्लेखांवरून दिसून येते. त्यामुळे भारतीय संगीताच्या इतिहासात संस्कृत ग्रंथाना विशेष महत्व आहे. त्या काळात ज्या प्रकारचे संगीत उपलब्ध होते त्याचा संस्कृत मध्ये उल्लेख असल्यामुळे आपण त्यावरून अभ्यास करून असा निष्कर्ष काढू शकतो की त्या काळातील संगीताचा उगम स्थिती, विकास, प्रचार, सामाजिक स्थिती कशा प्रकारे प्रगत होत गेली. म्हणून संगीत आणि संस्कृत यांचा अनदिकालापासुन संबंध आहे आणि राहील याची अनादिकालापासुन भारतीय संगीताच्या इतिहासात नोंद कायम राहील.



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

ऋग्वेदापासुन सामवेद, ब्राम्हणग्रंथ, आरण्यक, उपनिषद, कल्पसुत्र, प्रातिशाख्य, शिक्षाग्रंथ, रामायण, महाभारत, स्मृतिग्रंथ, अष्टाध्ययी, कौटिल्याचे अर्थशास्त्र, पतंजली, कालीदासची दहा महाकाव्ये, भास, शुद्रक यांची अनेक महान संस्कृत महानाट्य इ. सर्व संस्कृत ग्रंथामध्ये संगीताची त्याकाळात असलेली स्थिती अतिशय सुक्ष्म पध्दतीने लिहीलेली आहे म्हणून वरील सर्व ग्रंथ भारतीय संगीताच्या इतिहासात महत्वपूर्ण मानले जातात आणि या ग्रंथाशिवाय भारतीय संगीत परीपूर्ण होवू शकत नाही असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

**संदर्भग्रंथ**

१. संगीतशास्त्र - मोहना मार्डीकर

२. संगीत स्वरावली- अशोक कुमार यमन

३. भारतीय संगीत का इतिहास- डॉ. शरतचंद्र परांजपे

४. भारतीय संगीत का इतिहास - भगवतचरण शर्मा

५. भारतीय संगीत का इतिहास - उमेश जोशी



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad